Gmail

DSPPL Devrukh <info.dsppl@gmail.com>

# स्वामी विवेकानंद विशेष... चैतन्य डिजिटल न्यूज़लेटर (मराठी) भाग 01 अंक 10

**Ashish Muley** <muleyashish4@gmail.com> Sun, Jan 15, 2023 at 6:50 AM
To: ajit telang <artelang01@yahoo.com>, Pranjal Joshi <pranjal@capranjaljoshi.com>, DSPPL Devrukh <info.dsppl@gmail.com>







प्रिय वाचकांनो,

१२ जानेवारी हा भारतासाठी खास दिवस आहे. खास यासाठी कि याच  दिवशी १८६३ साली स्वामी विवेकानंदांचा जन्म झाला.  १९व्या शतकातील भारत मातेचे स्वामीजी एक  महान संत आहेत, जे त्यांनी केलेल्या अतुलनीय  कार्यासाठी संपूर्ण विश्वाच्या स्मरणात आजही आहेत. किंबहुना, मला तर असे वाटते कि स्वामीजींच्या शिकवणीची प्रासंगिकता, भूतकाळातील कोणत्याही टप्प्यापेक्षा आजच्या काळात  सर्वाधीक आहे.

स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या आधीचा पारंपारिक हिंदू धर्म आणि आज आपण ओळखत असलेली हिंदू संस्कृती यांच्यात एक ज्ञानाचा सेतू बांधला. त्यांनी हिंदू संस्कृती वैज्ञानिक आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातुन जगासमोर तर मांडलीच पण 19व्या शतकात भारतात देखील या बाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. आपल्या विद्ववत्तापूर्ण पण सामान्य जनांना समजेल व त्याचवेळी आपल्या प्राचीन तत्त्वज्ञानाला पाश्चात्य दृष्टीकोनातून जीवनाशी जोडता येईल अशी अनेक व्याख्याने त्यांनी दिली. या सगळ्याची  सुरुवात १८९३ मध्ये शिकागो इंटरफेथ कॉन्फरन्समधील त्यांच्या प्रसिद्ध व्याख्यानाने झाली. त्या एका महान घटनेद्वारे खऱ्या अर्थाने हिंदू धर्म जागतिक नकाशावर आला.

आजच्या हिंदू नवजागरणाला स्वामीजींच्या शिकवणी आणि उपक्रमांचे फलित म्हणता येईल. त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्व आणि कार्यापेक्षा राष्ट्र आणि संस्कृतीला नेहमीच प्राधान्य दिले  आणि अनेकांना अध्यात्मिक मार्गावर पुढे येण्यासाठी  एक आदर्श  उदाहरण घालून दिले. आपला  DSPPL सातत्याने ज्या "चौथ्या मार्गाबद्दल" सखोलपणे बोलतो ("जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अध्यात्म" ) त्याचे पहिले समर्थक स्वामीजी  होते. स्वामीजींची एक शिकवण आजच्या काळात फार मोलाची आहे "जर संपत्ती गमावलीत  तर काहीच गमावले नाहीत. जर आरोग्य गमावलेत तर काहीतरी गमावलेत, पण जर तुम्ही चारित्र्य गमावलेत  तर मात्र तुम्ही सर्व काही गमावलेत". एखाद्या व्यक्तीचे नैतिक चारित्र्य हा सर्वात महत्त्वाचा गुण म्हणून त्यांनी यावर जोर दिला. बाकी सर्व काही थांबू शकते. आपल्या DSPPL संस्थेचा उद्देश देखील नवीन पिढीमध्ये एक सशक्त मानवी चारित्र्य निर्माण करणे हाच  आहे जो आम्ही आमच्या विविध उपक्रमांद्वारे साध्य

करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सशक्त नैतिक चारित्र्य असलेले आजचे मूल भविष्यातील अद्‌भुत, स्वर्गासारख्या समाजाला जन्म देऊ शकते. आजच्या या शुभदिनी आपण सर्वजण आदर्श व्यक्ती बनू आणि आपली संस्कृती आणि आपल्या राष्ट्राचा अभिमान बाळगू असा संकल्प करूया. "उत्तिष्ठ, जागृत !" हीच या दिवसाची घोषणा आहे.




स्वामी विवेकानंदांचे काही प्रसिद्ध विचार :

**"एक कल्पना घ्या. त्या एका  कल्पनेलाच  तुमचे जीवन बनवा; तेच एक स्वप्न; फक्त त्याचाच विचार करा; त्या कल्पनेवरच जगा. मेंदू, शरीर, स्नायू, मज्जातंतू, तुमच्या शरीराचा प्रत्येक कण अन कण  त्या कल्पनेने भारावून जाऊ देत आणि इतर प्रत्येक कल्पना सोडून द्या. हाच  यशाचा मार्ग आहे आणि याच मार्गाने महान आध्यात्मिक दिग्गज निर्माण होतात."**

**"इंद्रिये घोडे आहेत, मन हे लगाम आहे, बुद्धी सारथी आहे, आत्मा स्वार आहे आणि शरीर हा रथ आहे. घराचा स्वामी, राजा, म्हणजेच आत्मा मनुष्यस्वरूपी  रथात बसला आहे."**

**"आपण म्हणजे आपले विचार ! या विचारांनीच आपण जे काही आहोत, त्याला बनवले आहे; त्यामुळे तुम्हाला काय वाटते याची काळजी घ्या. शब्द गौण आहेत. विचार जगतात; अन दीर्घकाळ टिकतात देखील ! "**

**"प्रेम आपल्याला विशाल बनविते तर स्वार्थ आपल्याला संकुचित बनविते. त्यामुळे प्रेम हाच जीवनाचा गाभा आहे. जो प्रेम करतो तोच  खरा जगतो, जो स्वार्थी असतो तो रोज मरत असतो. ज्याप्रमाणे तुम्ही जगण्यासाठी श्वास घेता, त्याचप्रमाणे प्रेमासाठी प्रेम करा. कारण जगण्याचा हाच एकमेव उपाय आहे"**

**"आपल्याला उष्णता देणारा अग्नी आपल्यालाही भस्मसात देखील करू शकतो; कारण दोष आगीचा नाही."**

**"आपण जे आहोत त्यासाठी आपण स्वतः जबाबदार आहोत, आणि आपण जे काही बनू इच्छितो, ते बनवण्याची ताकद आपल्यातच आहे. जर आपण सध्या जे आहोत ते आपल्या भूतकाळातील कृतींचे फलित असेल, तर भविष्यात आपण जे काही बनू इच्छितो ते आपल्या वर्तमान कृतींमुळेच निर्माण होऊ शकते, हे ध्यानात ठेवा. त्यामुळे आज कसे वागायचे आहे, हे तुम्हीच ठरवा"**

**तुम्हाला स्वामी विवेकानंदांचे दुसरे प्रसिद्ध वाक्य आठवते का?**
**येथे क्लिक करा आणि आमच्यासह शेर करा!**




**DSPPL च्या प्रिय विद्यार्थी आणि माझ्या तरुण मित्रांनो,**

तुम्हा सर्वांना आनंदी, निरोगी आणि आनंदाचे वर्ष जावो ही शुभेच्छा !

खरे सांगायचे तर सनातन धर्माचे पालन करणाऱ्या लोकांसाठी १ जानेवारीला नवीन वर्ष सुरु होत नाही. या भारत भूमीवर राहणारे लोक मकर संक्रांत हा सण नव्याने सुरुवात करण्यासाठी नेहमीच शुभ काळ मानतात. पाश्चात्य संस्कृतीने नेहमीच क्रांती पाहिली आहे. मग ती फ्रेंच क्रांती असेल , रशियन क्रांती, वा अमेरिकन क्रांती असेल. त्यांचा नेहमी इतरांशी युद्ध करणे आणि जमिनी जिंकणे यावरच विश्वास होता. भारत मात्र नेहमीच निसर्गाशी एकरूप राहिला आहे. आपल्या महाकाव्यांमध्ये युद्धाची वर्णने आहेत, परंतु ती सत्यासाठी आणि धर्माच्या स्थापनेसाठी लढली गेली. त्यामुळेच आपल्याकडे संक्रांती आहे. मकर संक्रांतीच्या रूपाने आपल्यासाठी क्रांती म्हणजे नेमके काय त्याचा शोध घेऊयात.

मकर संक्रांती हा एक शुभ दिवस आहे. जेव्हा सूर्य मकर राशीत प्रवेश करतो जो हिवाळ्याचा शेवट दिवस मानलं जातो. उन्हाळ्याची सुरुवात आणि रात्रीपेक्षा दिवस मोठा याचा प्रारंभ हा सण दर्शवितो. हा शुभ सण वसंत ऋतुच्या प्रारंभाची सूचना देतो. हा सण धान्य कापणीचे प्रतीक देखील आहे. या दिवसापासून सूर्य उत्तरेकडे प्रवास करतो म्हणून याला उत्तरायणाचा प्रारंभ असे देखील मानले जाते.

मकर संक्रांतीचा सण सौरचक्राच्या निश्चित वेळेमुळे दरवर्षी १४ जानेवारी रोजी साजरा केला जातो. लीप वर्ष वगळता ही तारीख १५ जानेवारी रोजी पाळली जाते.
भारतातील हा प्रसिद्ध धान्य कापणी उत्सव म्हणून उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे न चुकता साजरा केला जातो. उत्तर प्रदेश व्यतिरिक्त, भारतातील हरियाणा, राजस्थान आणि बिहार या राज्यांमध्ये तसेच राजधानी दिल्लीतही हा सण त्याच नावाने साजरा केला जातो. गुजरातमध्ये उत्तरायण, तामिळनाडूमध्ये पोंगल, आसाममध्ये माघ बिहू आणि पंजाबमध्ये लोहरी म्हणूनही हा सण साजरा केला जातो.

**मकर संक्रांतीचा इतिहास**
एक पौराणिक कथा आहे, की प्राचीन लोक देखील मकर संक्रांती साजरी करत असत परंतु सूर्यदेवाची उपासना करणे हा त्यामागील उद्देश होता. जेणेकरून तो त्यांना कडाक्याच्या थंडीपासून वाचवेल. आणखी एक लोकप्रिय लोककथा सांगते की या दिवशी भगीरथ राजाने गंगा नदी पृथ्वीवर आणली. त्यासाठी हा सण साजरा केला जातो.
उत्तरायणाचा काळ जो मकर संक्रांतीने सुरू होतो त्याचा उल्लेख महाभारतातही आढळतो कारण भीष्म आपल्या नश्वर देह सोडण्यासाठी उत्तरायणाची वाट पाहत होते. असे मानले जाते की या काळात मरणारे लोक जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटतात.

**मकर संक्रांती उत्सव २०२३ चे प्रमुख आकर्षण**
मकर संक्रांती हा वर्षातील पहिला सण आहे जो भारतातील जवळजवळ प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या नावाने आणि विधींनी साजरा केला जातो. विविधतेतील एकतेचे हे एक उत्तम उदाहरण आहे जे उत्सवाचे प्रमुख आकर्षण देखील आहे.
1. अन्न - भारतातील एक लोकप्रिय सण असल्याने, त्याच्याशी संबंधित आयकॉनिक डिशेस देखील या सणाचे एक प्रमुख आकर्षण आहे. उत्तर भारतातील लोक या शुभ दिवशी तुपाचा चुरमा, तिळपत्ती, गजक, रेवरी, तिळाचे लाडू, गुळ (गूळ) आणि खिचडी यासारखे प्रादेशिक पदार्थ तयार करतात.
2. पतंग उडवणे - मकर संक्रांतीच्या सर्वात रोमांचक अशा ठळक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे पतंग उडवणे, जे प्रामुख्याने उत्तर प्रदेश, राजस्थान आणि गुजरातच्या शहरांमध्ये पाळले जाते. लोक त्यांचे पतंग सजवतात किंवा विशेषत: उत्सवासाठी पतंगांचे विविध आकार आणि रंग निवडतात. गुजरातमध्ये, आंतरराष्ट्रीय पतंग उडवण्याचा उत्सव जगभरातील अभ्यागतांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे.
3. खिचडी, डाळी, आणि तीळ दान - भारताच्या उत्तरेकडील भागातील लोक डाळी, गूळ आणि तीळ यांसारख्या घटकांपासून बनवलेला प्रसाद तयार करतात. हा प्रसाद सूर्यदेवाला अर्पण केल्यानंतर ते दान करतात आणि स्वतः देखील या प्रसादाचे सेवन करतात.
4. त्रिवेणी संगम येथे माघ मेळ्यात पवित्र स्नान - मकर संक्रांतीच्या सणादरम्यान लोक प्रयागराजजवळील त्रिवेणी संगमाकडे जातात. गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचे संगमस्थान असलेल्या त्रिवेणी संगमाच्या पवित्र पाण्यात या दिवशी स्नान करणे शुभ मानले जाते. मकर संक्रांतीच्या पवित्र डुबकीमुळे माणसाची पापेही धुऊन जातात, असे देखील मानतात.







"साहिल ! "हॅप्पी न्यू इयर", २ जानेवारी २०२३ ला  शाळेच्या वाटेवर हरी त्याच्या मित्राला म्हणाला.  "हॅप्पी न्यू इयर हरी" साहिलने हसतमुखाने उत्तर दिले.

**साहिल** - मग काय ? तुझा नवीन वर्षाचा संकल्प काय आहे?

**हरी**: मी ठरवले आहे कि मी राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा जिंकणार !

**साहिल** : अरे वा ! आणि मग तू ती स्पर्धा  जिंकल्यावर  काय होईल ?

**हरी** : काय होईल म्हणजे ? मला आनंद वाटेल

**साहिल** : ओके, ठीक आहे, मित्रा.

**हरी**: साहिल, अरे पण तुझा नवीन वर्षाचा संकल्प काय आहे?
**साहिल**: "प्रत्येक दिवस आनंदाने घालवायचा" हाच संकल्प !.
**हरी (आश्चर्यजनक चेहऱ्याने)** : हा कसला संकल्प? आणि, हे कसे शक्य आहे?
**साहिल**: अरे खरंच, जर आपण एकमेकांना "नवीन वर्षाच्या शुभेच्छा" देतो , तर मग आपल्याला सगळे वर्ष आनंदात गेले पाहिजे ना ! हे शक्य आहे, कारण बाबा म्हणतात की आपण आपले भाग्य घडवतो. आजूबाजूच्या परिस्थिती, आणि लोकांवर आपले नियंत्रण असू शकत नाही. परंतु आपल्याला कसे वाटते, आपण प्रतेय्क परिस्थितीत काय प्रतिसाद देतो आणि कशाची निवड करतो हे पूर्णपणे आपल्या हातात आहे. मग आपला रिमोट कंट्रोल आपण दुसऱ्याला देण्याची गरज नाही ! मी जे काही करेन ते आनंदाने करेन. मग ते खेळ असो, अभ्यास असो, शाळा असो किंवा क्लास असो.
साहिलच्या उत्तरांनी हरी गोंधळून गेला आणि निश्चितच त्याला खोलवर विचार करायला भाग पडलं. त्याच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह पाहून साहिल म्हणाला - **"अरे, हा एक प्रयोग आहे मित्रा ! करून बघायला काय हरकत आहे ?"**
दोघेही आनंदाने हसले आणि त्यांच्या वर्गाकडे गेले.




प्रिय विद्यार्थी मित्रांनो !
तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा. नवीन वर्ष आपल्याला आत्मचिंतन करण्यास आणि आपल्या भावी जीवनाकडे सकारात्मक पाऊल उचलण्यास नेहमीच मदत करते. चेन्नईच्या श्री रामकृष्ण मठाने चालवल्या जाणाऱ्या मासिकात मला एक कथा वाचायला मिळाली. टी मला खूप आवडली, म्हणून मग तुम्हालाही ती मी सांगू इचछीते.

उमर हा अरबांचा राजा होता आणि त्याने प्रेषित मुहम्मद यांच्या नेतृत्वात इस्लामचा स्वीकार केला. राज्यातील लोकांचे काय चालले आहे हे जाणून घेण्यासाठी तो एकदा वेषांतर करून आपल्या देशात फिरत होता. त्याला एक मेंढपाळ भेटला. त्याने मुलाला पैशाच्या बदल्यात एक मेंढरू देण्यास सांगितले. मुलगा म्हणाला हे मेंढरू माझ्या मालकाचे आहे, मी त्यांच्यासाठी काम करतो. तुम्ही त्यांना विचारू शकता आणि त्यांच्याकडून ते विकत घेऊ शकता. पण परस्पर ते विकण्याचा मला अधिकार नाही. राजा उमर म्हणाला, इतक्या मेंढाऱ्यांमध्ये एक मला दिलेस तर तुझ्या मालकाला कळणार देखील नाही. दे मला आणि मी तुला त्याचे पैसे देईन.

मुलगा म्हणाला, माझ्या मालकाला कदाचित कळणार नाही, पण हे पाप मी देवापासून कसे लपवू शकतो ? हे उत्तर ऐकून उमर राजाला खूप आनंद झाला आणि तो त्याच्या मालकाकडे गेला आणि म्हणाला मला या मेंढपाळ मुलाला गुलामगिरीतून मुक्त करायचे आहे. मालकाने खूप मोठी रक्कम त्याच्याकडे मागितली. राजा उमरने लगेच होकार दिला. मालकाने त्याला विचारले, तू या गरीब मुलाला ओळखतही नाहीस. तर मग एवढी मोठी रक्कम का देत आहेस ? राजा उमर म्हणाला की प्रामाणिक व्यक्ती शोधणे खूप अवघड आहे. हा मुलगा तसाच आहे आणि मी त्याच्यासाठी कितीही पैसे देण्यास तयार आहे. राजा उमर या मेंढपाळ मुलाला सोबत घेऊन त्याच्या राजवाड्यात गेला, त्याला शिकवले आणि मोठे केले.


प्रिय विद्यार्थी मित्रांनो, आपल्या सर्वांना माहित आहे की प्रामाणिकपणा हा सर्वोत्तम गुण आहे. जेव्हा तुम्ही प्रामाणिक असता तेव्हा जे काही चांगले असते ते तुमच्याकडे आकर्षित होते. प्रत्येक दिवस हा नवीन दिवस असतो, फक्त एक जानेवारीच नाही. त्यामुळे प्रामाणिकपणा या रेकी तत्वाचा दररोज सराव करूयात
"केवळ आजच्या दिवस मी माझे काम प्रामाणिकपणे करेन"

## 📼 व्हिडिओ सूचना:
*चेंजमेकर - श्री. एरन्ना कोसिगी*
*रायचूरच्या हिरवाईसाठी 10,000+ झाडे लावली*




हा व्हिडिओ पहा आणि आम्हाला सांगा, तुम्ही या महान चेंजमेकरची वैशिष्ट्ये DSPPL ने शिकवलेल्या 24 मूल्यांशी जोडू शकता का !!!

## 24 मूल्यांचे चाक खाली पहा आणि त्याबद्दल विचार करा...




### येथे क्लिक करा आणि आमच्यासह शेर करा!

श्री एरन्ना कोसिगी यांनी प्रदर्शित केलेले किमान 3 महत्त्वाची मूल्ये सूचीबद्ध करा आणि स्पष्ट करा.

### संपर्कात राहा!

### तुमच्या सूचना आणि अभिप्राय येथे पाठवा:

info.dsppl@gmail.com or Whatsapp on +918197056644

Copyrights © Devrukh Spiritual Prowess Private Limited